# मोफत आरोग्य तपासणी व औषधेपचार महाशिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद
# १२ हजारहून अधिक नागरिकांनी घेतला लाभ

पनवेल(प्रतिनिधी) लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात आज (रविवार, दि.०३) झालेल्या मोफत आरोग्य तपासणी व औषधेपचार महाशिबीराचा १२ हजारहून अधिक रूग्णांनी लाभ घेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि रायगड मेडीकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या महाशिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महाशिबीरात सर्वसाधारण रोग तपासणी, मधुमेह, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, रक्त तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी, दंतरोग तपासणी, आयुर्वेदीक व होमिओपॅथी तपासणी, ह्दयरोग तपासणी, मधुमेह तपासणी, हाडांचे रोग तपासणी आणि औषधोपचार तसेच नेत्र तपासणी व गरजूंना चष्मे वाटप व कर्णबधिरांना श्रवणयंत्र देण्यात आली. हे महाशिबीर यशस्वी करण्यासाठी श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, रायगड मेडिकल असोसिएशन, वीट सेंटर पनवेल, लक्ष्मी आय इन्स्टिटयूट, एमजीएम हॉस्पिटल कळंबोली-कामोठे, भारती विद्यापीठ खारघर, रोटरी क्लब पनवेल, डॉ.डि.वाय.पाटील हॉस्पिटल नेरूल, तेरणा मेडिकल कॉलेज नेरूल व पनवेल परिसरातील ३५० वैद्यकीय तज्ञांनी तसेच कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रात पनवेलसाठी योगदान देणारे ज्येष्ठ डॉक्टर प्रमोद गांधी, डॉ.सुहास हळदीपूरकर, डॉ.गिरीष गुणे, डॉ.अरूण रानडे, डॉ.रमेश पटेल, डॉ.प्रमोद गांधी, डॉ.घनश्याम वैष्णव, एस.जे.लाहोटी, डॉ.भक्तीकुमार दवे, समीर सहस्त्रबुध्दे, डॉ.सुभाष सिंग, डॉ.बिरामोले यांच्यासह अनेक ज्येष्ठ डॉक्टरांचा श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्यावतीने सन्मानचिन्ह देवून सत्कार करण्यात आले.

या शिबिरास महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस अ‍ॅड.महादेव शेलार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष आर.सी.घरत, उपाध्यक्ष जी.आर.पाटील, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, राज्यातील माथाडी कामगारांचे नेते बळवंतराव पवार, पनवेल तालुका अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, जिल्हा कॉंग्रेसचे खजिनदार बशीर शेख, महाराष्ट्र प्रदेश इंटकचे कार्याध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, ज्येष्ठ नेते शशिकांत बांदोडकर, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.प्रमोद गांधी, शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख, जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद राजेंद्र पाटील, शहर अध्यक्ष जयंत पगडे, कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरविंद सावळेकर, जिल्हा उपाध्यक्ष सुदाम पाटील, इंटकचे तालुकाध्यक्ष संजय पाटील, अनुसुचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश बिनेदार, महिला कॉंग्रेसच्या तालुकाध्यक्षा अ‍ॅड.आशा भगत, शहर अध्यक्षा वर्षा नाईक, तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत, शहर कार्याध्यक्ष सुहासिनी शिवणेकर, पनवेल विधानसभा महिला प्रभारी दर्शना भोईर, गटनेते अनिल भगत, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, बांधकाम सभापती राजू सोनी, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी,मावळ लोकसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमोल, पनवेल विधानसभा अध्यक्ष दशरथ म्हात्रे, एनएसयुआय जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विभागीय अध्यक्ष, सरपंच, उपसरपंच, सदस्य, विविध संस्था, संघटनेचे पदाधिकारी आणि नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

**लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेहमी समाजाप्रती आपले योगदान दिले आहे. सामाजिक, राजकीय, कला, कीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्याबरोबरच वैद्यकीय क्षेत्रातील त्यांचे योगदान आदर्शवत आहे. गोरगरीबांची जाण त्यांना आहे म्हणूनच त्यांच्याकडून सातत्याने समाजसेवा घडत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये विकासकामांचा महामेरू उभारून पनवेलच्या जनतेला सोयीसुविधा मिळवून दिल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा प्रशांत ठाकूर प्रचंड मतांनी निवडून येतील आणि पनवेलच्या विकासामध्ये आणखी भर पडेल. रामशेठ ठाकूर व प्रशांत ठाकूर गोरगरीबाला देव मानून काम करत आहेत, त्यामुळे ते खऱ्या अर्थाने ते देवाची सेवा करीत आहेत.** **- अ‍ॅड.महादेव शेलार**

**आमदार प्रशांत ठाकूर नेहमी पनवेलच्या विकासासाठी आग्रही राहिले आहेत. माथाडी कामगारांचा नेता म्हणून राज्यभरात फिरणे होते पण आजपर्यंत अशा प्रकारचा भव्यदिव्य महाशिबीर मी कुठेही पाहिले नाही. उत्तम नियोजन, प्रत्येक रूग्णाची या शिबीरातून काळजी घेतली जात असून हीच जनसेवा आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलचा विकासाचा आलेख उंचावत ठेवला आहे. अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेले आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठिशी माथाडी कामगार ठामपणे उभी आहे आणि यापुढेही राहिल.**

**- बळवंतराव पवार, नेते, राज्य माथाडी कामगार**

**दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या महाशिबीरात नागरिक उत्स्फूर्तपणे सहभाग घेत असतात. यंदाही मोठया प्रमाणात सहभाग नोंदविला गेला आहे. रूग्णांना योग्य सेवा मिळाली पाहिजे यासाठी रायगड मेडिकल असोसिएशन आणि पनवेल परिसरातील डॉक्टर व त्यांचे सहाय्यक, कार्यकर्ते, स्वयंसेवक यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे हे शिबीर यशस्वी झाले आहे, त्याबद्दल मी सर्वांचे आभार व धन्यवाद मानतो.** **-आमदार प्रशांत ठाकूर**